## टोलचा निर्णय झाला नाही, म्हणून जनतेला दिलेला शब्द पाळून,

# प्रशांत ठाकूर यांनी दिला आमदारकीचा राजीनामा!

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

खारघर टोलनाक्यातून स्थानिक ग्रामपंचायती हद्दीतील गावांना आणि पनवेल तालुक्याला सूट देण्याचा शासनाचा निर्णय आचारसंहिता जारी होण्यापूर्वी जाहीर करण्यात आला नाही, म्हणून जाहीरपणे शब्द दिल्याप्रमाणे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या आमदारपदाचा राजीनामा विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील यांच्याकडे सुपूर्द केला, तसेच त्याची प्रत विधानमंडळाचे प्रधान सचिव अनंत कळसे यांच्याकडेही सुपूर्द केली.

विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देताना तो स्वहस्ताक्षरात सचिवांच्या समोर बसून लिहावा लागतो आणि स्वतः आमदाराने सादर करावा लागतो. त्या नियमानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांनी १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघाचा आमदार म्हणून राजीनामा सादर केला.

जून महिन्याच्या विधानसभा अधिवेशनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर टोलनाका सुरू झाल्यानंतर चार-साडेचार किलोमीटर हद्दीतील स्थानिक नागरिकांना या टोलनाक्यामुळे अकारण भुर्दंड बसणार असल्याची स्पष्ट जाणीव सरकारला करून दिली होती आणि हा टोलनाका रद्द झाला पाहिजे किंवा स्थानिकांना त्यातून सूट मिळाली पहिजे, अशीही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. या मागणीच्या वेळी राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आश्वासन दिले होते की, संबंधितांची बैठक घेऊन त्यातून मार्ग काढला जाईल. अधिवेशन १९ जूनला संपले. संपूर्ण जून महिना निघून गेला, तरी शासनामार्फत खारघर टोलनाक्यातून स्थानिकांना सूट देण्याबाबत कोणतीही हालचाल झाली नाही. चार-साडेचार किलोमीटर परिसरात म्हणजे टोलनाक्याच्या भोवती राहाणाऱ्या पनवेल तालुक्यातील या सर्व गावांना कारण नसताना भुर्दंड पडणार हे स्पष्ट दिसू लागले. मुलांना शाळेत नेताना ४० रुपये भरावे लागणार आणि परत आणतानाही तेवढेच पैसे. वकील, डॉक्टर, बाजारहाट या प्रत्येक खेपेला ८० रुपयांचा भुर्दंड स्थानिक नागरिकांना द्यावा लागणार असल्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांनी निर्वाणीची भूमिका घेतली आणि जाहीर केले की, 'हल्लाबोल-नो-टोल' त्यानुसार मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना आंदोलनाबाबत पत्र देऊन ११ जुलै २०१४ रोजी रास्ता रोको आंदोलन जाहीर करण्यात आले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तुफान पावसात हजारो लोकांनी रास्ता रोको केला. दुतर्फा वाहतूक ठप्प झाल्यावर ही माहिती प्रदेश अध्यक्ष माणिकराव ठाकरे यांनी ते चंद्रपूर येथे असताना फोनवरून मुख्यमंत्र्यांना कळवली. त्यानंतर रास्ता रोको चालू असतानाच मुख्यमंत्र्यांचा रामशेठ ठाकूर आणि प्रशांत ठाकूर यांना फोन आला आणि त्यांनी सांगितले की, उद्याच यासंबंधात बैठक बोलावतो. आंदोलन मागे घ्या.

मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर १२ जुलै २०१४ रोजी सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. या बैठकीला मुख्य सचिव सहारिया, बांधकाम सचिव नाईक, एमएसआरडीसीचे कार्यकारी संचालक देवधर आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री गणेश नाईक हेही बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी असे स्पष्ट मत व्यक्त केले की, स्थानिकांकडून टोल घेणे योग्य नाही. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी स्वतःहून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली तातडीने समितीची नेमणूक केल्याचे जाहीर केले आणि एक महिन्याच्या आत (१२ ऑगस्ट) समितीने आपला अहवाल द्यावा, असे सांगितले. त्यानंतर बैठक संपली. बैठक संपवून मुख्यमंत्री बाहेर आल्यानंतर मल्हार चॅनेलला मुख्यमंत्र्यांनी मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी सांगितले

की, स्थानिकांना टोल लावणे संपूर्णपणे अव्यवहार्यच आहे. तो लावला जाणार नाही, परंतु बीओटी तत्त्वावरचा हा संपूर्ण टोलनाकाच चुकीचा झालेला आहे. तो हलविण्याचा विचार करावा लागेल.

मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयाचे जोरदार स्वागत झाले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. दरम्यान, ३१ जुलै रोजी मुख्य सचिव सहारिया निवृत्त झाले आणि नवे सचिव स्वाधीन क्षत्रिय आले. त्यांना हा सगळा विषय समजावून सांगण्यात आला, तसेच मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रशांत ठाकूर हे स्वतंत्रपणे ऑगस्ट महिन्यात किमान ४ ते ५ वेळा भेटले. आरटीओ श्रेणी क्र. ४६ व श्रेणी क्र. ०६ यांना सवलत मिळावी, अशी मागणी होती. पनवेल येथे आरटीओ दोन वर्षापूर्वी स्थापन झालेले आहे. त्या नवीन आरटीओची श्रेणी ४६ आहे. पनवेल परिसरातील नागरिकांनी दोन वर्षापूर्वी खरेदी केलेल्या गाड्यांचा आरटीओ नंबर एम.एच. ०६ होता. त्यामुळे सूट देताना एम.एच. ४६ आणि  एम.एच. ०६ अशा श्रेणीला सूट मिळावी, अशी मागणी करताना मुख्यमंत्र्यांना हे पटवून देण्यात आले होते की, मानखुर्दपासून खारघरपर्यंत २६ किलोमीटरला टोल लागत नाही आणि पनवेलपासून ४ किलोमीटरवर स्थानिकांना टोल द्यावा, लागतो आहे. हा अन्याय्य टोल आहे. म्हणून तो रद्द करा.

ऑगस्ट महिन्यात किमान ४ ते ५ वेळा आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्र्यांशी या विषयावर भेट घेतली असताना प्रत्येक वेळी 'प्रशांत तुझे काम झाले आहे,' असे मुख्यमंत्री स्वतः सांगत होते, मात्र बांधकाम सचिव आणि मुख्य सचिव पातळीवर या संबंधीचे कोणतेही आदेश नव्हते. आचारसंहिता प्रत्येक दिवशी जवळ येत चालली होती आणि म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर  आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी निर्णय होत नाही असे पाहून ६ सप्टेंबर रोजी जाहीर केले की, जर आचारसंहितेपूर्वी निर्णय झाला नाही, तर १२ सप्टेंबर रोजी (सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीला बरोबर २ महिने झाल्यावर) प्रशांत ठाकूर आमदारकीचा राजीनामा देतील आणि विधानसभा निवडणुकीत उभे राहाणार नाहीत. ही घोषणा झाल्यावर ९ सप्टेंबर रोजी पनवेलल्या काँग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांनी (जि.प. सदस्य, नगर परिषद सदस्य, पदाधिकारी) आपले सामुदायिक राजीनामे द्यायचे, अशी घोषणा करून ३०० लोकांनी प्रदेश काँग्रेसच्या गांधीभवनमध्ये कूच केले. त्या ठिकाणी बैठकीला आलले मुख्यमंत्री प्रशांतचे काम झाले आहे, असेच म्हणणे मांडत राहिले. प्रत्यक्षात जी समिती नेमली त्या समितीने शिफारस केल्याप्रमाणे आरटीओ श्रेणी क्र. ४६ आणि ०६ यांना सूट न देता पनवेल शहर (नवीन पनवेल त्यात नाही, खांदा कॉलनी नाही किंवा कोणत्याही वसाहती नाहीत) कामोठा,  कळंबोली, खारघर, कोपर या गावांचा समावेश करण्यात आला होता. ग्रामपंचायतीचा समावेश त्यात केला गेला नाही. त्यामुळे अनेक गावांवर अन्याय होणार होता. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीत स्थानिक आमदार प्रशांत ठाकूर यांचा समावेश केला गेला असता (१२ जुलैच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांना तशी सूचना करण्यात आली होती) तर सुटलेल्या गावांचा घोळ झाला नसता आणि मुख्य सचिवांनी केलल्या शिफारसीतही त्रुटी राहिल्या नसत्या. जो प्रस्ताव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अवलोकनार्थ पाठवला गेला, त्या प्रस्तावातल्या त्रुटी दुरुस्त करून मुख्यमंत्र्यांकडे सुधारीत प्रस्ताव देण्यात आला, परंतु त्या प्रस्तावातील श्रेणी ४६ किंवा ०६ किंवा पनवेल तालुका असा कोणताही शब्द स्वीकारण्यास प्रशासकीय पातळीवर तयारी दर्शविण्यात आली नाही. त्यामुळे असा अपुरा प्रस्ताव स्वीकारला असता तर पनवेल तालुक्यातच विशिष्ट विभागास टोलमधून सूट आणि त्यांच्या शेजारच्या गावाला सूट नाही, अशी परिस्थिती निर्माण होऊन व्यक्तिगत संघर्ष निर्माण झाला असता. आमदार प्रशांत ठाकूर यांनी हा प्रस्ताव अमान्य केला. दुरुस्त प्रस्ताव स्वीकारायला सरकारने तयारी दाखवली नाही. तिथपर्यंत १२ तारीख उजाडली आणि दिलेला शब्द पाळण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर विधानभवनात येऊन थडकले.

विधानसभेचे सभापती ना. दिलीप वळसे–पाटील हे माळीण येथे पुनर्वसन व्यवस्थेत होते. त्यांच्याशी

फोनवर बोलणे झाले. त्यांनी प्रशांत ठाकूर यांना विनंती केली की, तुम्ही फक्त १० मिनिटे माझ्या चेंबरमध्ये थांबा. राजीनाम्याची घाई करू नका. मी मुख्यमंत्र्यांशी बोलतो. १० मिनिटांनी मला फोन करा.

प्रशांत ठाकूर म्हणाले, आम्ही चार महिने थांबलो आहोत, १० मिनिटे थांबायला काहीच हरकत नाही. त्यानुसार १५ मिनिटांनी दिलीप वळसे-पाटील यांचा फोन आला. त्यांचे आणि मुख्यमंत्र्यांचे बोलणे झाले होते. पनवेल तालुका किंवा श्रेणी क्र. ४६ आणि ०६ अशी दुरुस्ती स्वीकारली जाणार नाही, असे स्पष्ट झाले. तेव्हा प्रशांत ठाकूर यांनी विधानसभा अध्यक्षांना विनंती करून आतापर्यंत दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले आणि त्यांच्या व्यक्तिगत सचिवाकडे राजीनामा पत्र सादर केले.

तेथून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुका काँग्रेस अध्यक्ष लक्ष्मणशेठ ठाकूर यांच्यासह विधानमंडळाचे प्रधान सचिव अनंत कळसे यांना राजीनामा सोपविण्याकरिता ही मंडळी त्यांच्या दालनात गेली. तिथे स्वहस्ताक्षरात आमदार प्रशांत ठाकूर यांनी राजीनामा सादर केला. अनंत कळसे यांनी प्रशांत ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या. वाटेतच विधान परिषदेचे उपसभापती वसंत डावखरे यांची भेट झाली. त्यांनी या सर्व नेत्यांना त्यांच्या चेंबरमध्ये नेले आणि हसत हसत ते आमदार प्रशांत ठाकूर यांना म्हणाले, तू राजीनामा दिला असलास, तरी पुन्हा या सभागृहात येणारच आहेस. उपसभापतींच्या शुभेच्छा घेऊन ही सर्व नेतेमंडळी विधानभवनातून बाहेर पडली.

‘शोभेचा आमदार म्हणून मला राहायचे नाही...’

मुंबई : विशेष प्रतिनिधी

केवळ शोभेचा आमदार म्हणून काम करण्यापेक्षा त्या आमदारपदाचा त्याग करून टोलच्या विरोधातील संघर्ष रस्त्यावर जारी ठेवण्याचा निर्धार मी केला आहे आणि म्हणून विधानसभेच्या आमदारकीचा राजीनामा मी दिलेला असून, त्याबाबतचे पत्र आपल्या माहितीकरिता मी देत आहे, असे आमदार प्रशांत ठाूकर यांनी राजीनामा देण्यापूर्वी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे. या पत्रात मुख्यमंत्र्यांनी खारघर टोलनाक्यासंदर्भात वेळोवेळी कशी भूमिका घेतली आणि निर्णय करण्यात कशी दिरंगाई केली, याचा सगळा तपशील आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्पष्ट केला आहे. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेले पत्र असे आहे.

पनवेल तालुका व शहर काँग्रेसची उद्या महत्त्वपूर्ण बैठक

खारघर-कामोठे टोलप्रकरणी प्रशांत ठाकूर यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला. याप्रकरणी कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेण्यासाठी पनवेल तालुका व शहर काँग्रेसची रविवारी (दि.१४) महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सायं ४ वाजता होणाऱ्या या बैठकीला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका काँग्रेसचे अध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील आणि शहर अध्यक्ष जयंत पगडे यांनी केले आहे.